**प्रशासकीय मान्यता**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर या संस्थेच्या परिसरातील अंतर्गत रस्त्यांची सुधारणा व कॉक्रीट नालीचे बांधकाम

**महाराष्ट्र शासन**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : जीएचएल-२०१७/प्र.क्र.३२४/प्रशा-१**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल इमारत,
९ वा मजला, नविन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४००००१.
दिनांक : २१ मार्च, २०१८.

**वाचा :** संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक : संवैशिवसं/ शावैमला/ अंतर्गतरस्तेसुधा/१४११७/प(आय)/१६, ९५७९, दिनांक : २९.७.२०१७.

**शासन निर्णय :**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर या संस्थेच्या परिसरातील अंतर्गत रस्त्यांची सुधारणा व कॉक्रीट नालीचे बांधकाम करणेकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविलेल्या एकूण रुपये २४३.७१लक्ष (अक्षरी रुपये दोन कोटी त्रेचाळीस लक्ष एक्काहत्तर हजार फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | बांधकामाचे नाव | प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये | सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविलेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर या संस्थेच्या परिसरातील अंतर्गत रस्त्यांची सुधारणा व कॉक्रीट नालीचे बांधकाम करणे. | २,०९,४६,८२७ | २,४३,७१,००० |
| | **एकूण** | **२,०९,४६,८२७** | **२,४३,७१,०००** |

**अटी व शर्ती :-**

१) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदींबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

२) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक : इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क्र.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी- २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दिनांक ०७/०७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

४) नियोजन जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

५) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अभियंता/अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना संबंधीत संस्थेच्या अधीष्ठाता यांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

६) कामासाठी जागेची उपलब्धता, जागा पुरेशी आहे किंवा नाही, याबाबतची खात्री संबंधीत संस्था प्रमुखांनी करावी.

७) संबंधीत संस्थेच्या अधिष्ठातांनी या विभागाचे शासन परिपत्रक दिनांक ७.२.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

**२.** सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये. निधीची तरतूद झाल्यानंतर सदर काम हे खाली नमूद केलेल्या लेखाशीषाअंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

मागणी क्रमांक - एच-८
४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३, वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन,
१०५-विषमचिकित्सा पंचवार्षिक योजनांतर्गत
(४२१० ००४१) ५३- मोठी बांधकामे

**३.** हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान

केलेल्या अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९०/इमा-३, दिनांक २६.०२.२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३२११३२५३८२२१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.03.21 14:34:25 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर
४) सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-३) मंत्रालय, मुंबई.
५) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
७) निवडनस्ती (प्रशा-१)